नि.दि.दा.क्र.१२५/२०१९
अण्णा ...विरुध्द.. रामदास.

## आदेश निशानी क्र. २६ खाली

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी याने वादीने दावे अर्जीमध्ये कथन केलेले दस्तऐवज शपथेवर सादर करण्याचा आदेश होण्याकरिता दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ११ नियम १२ , १३ अन्वये दाखल केला आहे.

**प्रतिवादीचे कथन थोडक्यात खालील प्रमाणेः—**

२. वादीने प्रतिवादी विरुध्द दि. १८.०३.१९७५ चे रजिस्टर्ड विक्रीपत्र बेकायदेशीर आहे अशी घोषणा होण्याबद्दल सदर दावा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये परिच्छेद क्र. ६ मध्ये ‘‘ वादींनी झालेली विक्री बेकायदेशीर आहे अशी प्रार्थना करणारा दिवाणी दावा क्र.१५२/२००८ असा मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचेकडे दाखल केला जो न्यायालयाने नामंजूर केला. ’’ असे नमुद केले आहे. अशाप्रकारे वादीने केलेला प्रस्तुत दावा दि.१८/०३/१९७५ चे रजिस्टर्ड विक्रीपत्रासंबंधात असुन पुर्वीचा दावा क्र.१५२/२००८ हा सुध्दा दि. १८/०३/१९७५ चे रजिस्टर्ड विक्रीपत्रासंबंधात असल्याचे स्पष्ट होते. परंतु, वादीने दिवाणी दावा क्र.१५२/२००८ मधील दावे अर्जीची नक्कल व कोर्टाने दिलेले न्यायनिर्णय व हुकुमनाम्याची नक्कल दाव्यात दाखल केली नाही. अशा परिस्थितीत न्यायदानाला मदत होण्यासाठी वादीने दिवाणी दावा क्र.१५२/२००८ मधील दावे अर्जीची नक्कल व कोर्टाने दिलेले न्यायनिर्णय व हुकुमनाम्याची प्रमाणित प्रतिलीपी शपथेवर पेश करण्याचा वादीला आदेश होण्याची विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे सादर करुन अर्जास विरोध केला आहे. त्याच्या कथनानुसार प्रतिवादी मागत असलेले दस्ताऐवज वादी कडे नाहीत. दावा गुणदोषावर चालविण्याकरिता दिवाणी दावा क्र.१५२/२००८ चे अभिलेख मागविण्यात यावे.

४.		अभिलेखावरील दस्ताऐवजांचे अवलोकन केल असता असे दिसुन येते की, प्रतिवादीने दिवाणी दावा क्र.१५२/२००८ मधील न्यायनिर्णयाची व हुकुमनाम्याची छायांकित प्रत नि. १४ वरील कागदपत्रांच्या यादीसोबत दाखल केली आहे. प्रतिवादीने प्रस्तुत दाव्यात निशानी क्र. २२ वर दस्ताऐवज कबुल करण्यासाठी नोटीस दाखल केली आहे व त्यामध्ये दिवाणी दावा क्र.१५२/२००८ मधील न्यायनिर्णय व हुकुमनाम्याची प्रत इत्यादी दस्तऐवज नमुद केले आहे. वादीने निशानी क्र. २२ चे उत्तर निशानी २५ वर देऊन निशाणी क्र. २२ मध्ये नमुद असलेले दोन्ही दस्तऐवज कबुल केले आहेत. सदर प्रतिवादी क्र. १ हा देखील दिवाणी दावा क्र.१५२/२००८ या दाव्यात प्रतिवादी होता. त्यामुळे तो देखील सदर मागणी करत असलेले दस्तऐवज स्वत: दाखल करु शकतो. प्रतिवादीने दाखल केलेला प्रस्तुत अर्ज कायदेशीर नाही. सबब, खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

(जा.म.मिस्त्री)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
उमरेड.

दि. १५.०६.२०२२.